सिडको/व्य.सं./आरटीएस-अधिसूचना/२०२२/415  २१ सप्टेंबर, २०२२

अधिसूचना

"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५"अंतर्गत शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) प्राधिकरणामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी,प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची अधिसूचना….
महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१५

महाराष्ट्र शासनाद्वारे राज्यात दिल्या जाणाऱ्या लोकसेवांच्या वितरणाबाबतच्या राजपत्रानुसार लोकसेवा उक्त अधिनियमाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५"अंतर्गत शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) प्राधिकरणामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी,प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी अधिसूचित करणे क्रमप्राप्त आहे.

यालाच अनुसरुन नागरिकांची कामे विहीत कालावधीत व प्रशासनिक कार्यक्षमतेने व्हावीत यासाठी सिडको विविध विभागांतर्गत वितरीत केल्या जाणाऱ्या सेवांचे तपशिल, त्या पुरविण्यासाठी आवश्यक ती कालमर्यादा, सेवा पुरविणारा अधिकारी व सदरचा लाभ मिळण्यास अडचण निर्माण झाल्यास नागरिकांनी संपर्क साधावयाचा प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादि माहिती दर्शविणारी "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५" अधिसूचना शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) अनुसूचि "अ" मध्ये प्रकाशित करीत आहे.

डॉ. संजय मुखर्जी
मा.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,सिडको

स्थळ : सिडको भवन,नवी मुंबई
दिनांक : २३.०९.२०२२

अनुसूची - अ

"महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम - २०१५" अंतर्गत शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) प्राधिकरणामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा व पदनिर्देशित अधिकारी, (पदनाम), प्रथम व द्वितीय अधिकाऱ्यांच्या पदनिर्देशित नावाची यादी

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

| अ. क्र. | लोक सेवांची सूची | लोक सेवा अधिसूचित करावयाची कार्यालये व कार्यक्षेत्र | आवश्यक कागदपत्रे व शुल्क | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी (पदनाम) | प्रथम अपीलीय अधिकारी (पदनाम) | द्वितीय अपीलीय अधिकारी (पदनाम) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **व्यवस्थापक शहर सेवा - १/२/३ - वसाहत विभाग, १ ला मजला, सिडको भवन ५०० चौ.मी. च्या वरील सेवा** | | | | | | |
| | 1) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | **व्यवस्थापक शहर सेवा - १- ठाणे व्यवस्थापक शहर सेवा - २ - ठाणे/रायगड व्यवस्थापक शहर सेवा - ३- रायगड** | शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) स्तरावर निश्चित केलेले कागदपत्रे व शुल्क | 15 दिवस | सहा. वसाहत अधिकारी (वसाहत विभाग-1/2/3) | वसाहत अधिकारी (वसाहत विभाग-1/2/3) | व्यवस्थापक शहर सेवा-1/2/3 |
| | 2) वारसाहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | | | 15 दिवस | | | |
| | 3) थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | | | 3 दिवस | | | |
| | 4) गहाणखत ना हरकत प्रमाणपत्र देणे. | | | 7 दिवस | | | |
| २ | **व्यवस्थापक शहर सेवा - १/२/३ - वसाहत विभाग, १ ला मजला, सिडको भवन अंतर्गत विभागीय कार्यालय ५०० चौ.मी च्या खालील सेवा** | | | | | | |
| | 1) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | **ऐरोली/कोपरखैरणे-घणसोली/ वाशी/नेरुळ-सानपाडा/सीबीडी बेलापूर /उलवे-द्रोणागिरी /खारघर-कामोठे/पनवेल-कळंबोली विभागीयकार्यालय** | शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) स्तरावर निश्चित केलेले कागदपत्रे व शुल्क | 15दिवस | सहा. वसाहत अधिकारी (संबंधित विभागीय कार्यालय) | विकास अधिकारी/ वरिष्ठ विकास अधिकारी (संबंधित विभागीय कार्यालय) | व्यवस्थापक शहर सेवा-1/2/3 |
| | 2) वारसाहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | | | 15दिवस | | | |
| | 3) थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | | | 3 दिवस | | | |
| | 4) गहाणखत ना हरकत प्रमाणपत्र देणे. | | | 7 दिवस | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | **नियोजन विभाग, ४ था मजला, रायगड भवन** | | | | | | |
| | 1) प्रादेशिक योजनेतील झोन दाखला देणे. | | शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) स्तरावर निश्चित केलेले कागदपत्रे व शुल्क | 7 दिवस | सहयोगी नियोजनकार | वरिष्ठ नियोजनकार | मुख्य नियोजनकार |
| | 2) प्रादेशिक योजनेतील भाग नकाशा देणे. | | | 3 दिवस | | | |
| | 3) बांधकाम परवाना देणे. | | | 60 दिवस | | | |
| | 4) जोते प्रमाणपत्र देणे. | | | 15 दिवस | | | |
| | 5) भोगवटा प्रमाणपत्र देणे. | | | 30 दिवस | | | |
| ४ | **मुख्य अभियंता विभाग, ३ रा मजला, सिडको भवन** | | | | | | |
| | 1) नळ जोडणी देणे. | | शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) स्तरावर निश्चित केलेले कागदपत्रे व शुल्क | 15 दिवस | सहा. कार्यकारी अभियंता | कार्यकारी अभियंता | अधिक्षक अभियंता |
| | 2) मलनि:सारण जोडणी देणे. | | | 15 दिवस | | | |
| ५ | **अग्निशामन विभाग, ३ रा मजला, रायगड भवन** | | | | | | |
| | 1) अग्निशामन ना हरकत प्रमाणपत्र देणे. | | शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) स्तरावर निश्चित केलेले कागदपत्रे व शुल्क | 7 दिवस | अग्निशामन केंद्र अधिकारी | उप-मुख्य अग्निशामन अधिकारी | मुख्य अग्निशामन अधिकारी |
| | 2) अग्निशामन अंतिम ना हरकत प्रमाणपत्र देणे. | | | 15 दिवस | | | |